2017-18



IMPACT FACTOR
2. 66

ISSN 2393-8412
Indo Asian Social Science Research Journal (IASSRJ)
Issue : VII, Vol. II
Feb. 2017 To July 2017
www.irasg.com

**Research Paper** **12** **Sociology**

# शेतकरी वर्गासाठी महात्मा फुले यांचा आर्थिक दृष्टीकोन

**डॉ. विलास भगवानराव भिल्लारे**
समाजशास्त्र विभाग,
नवगण शिक्षण संस्थेला कला व विज्ञान
महाविद्यालय, चौसाळा, जि. बीड

महाराष्ट्रातील बहुजन समाजाला पददलित जनतेला आणि शुद्रातिशुद्रांना हजारो वर्षाच्या गाठनिद्रेश्न जागे करून त्यांना आपल्या न्याय हक्काची जाणिव करून देणारा आणि त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी विरत झगडणारा महामानव म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले तळागाळातील सर्व स्त्री–शुद्रांसाठी चंदनासारखे झीजणारे हे व्यक्तीमत्व अशा ज्योतिरावांचे सामाजिक विचार तर महत्वाचे ठरतातच तसे आर्थिक विचारही सर्वकश होते तेवढ्याच आटोपशीर पणे त्यांनी ते मांडले आहे.

**१) शेतकरी व गावगड्यांची परीस्थिती :**

भारत हा कृशी प्रधान देश आहे. त्यामुळे ग्रामीण भाग व तिथला शेतकरी अर्थव्यवस्थेचा महत्वाचा कणा समजला जातो. पूर्वी जंगलाचाराजा शेतकरी ओळखला जात होता. गरीब शेतकरी उंबर जांभूळ फणस मोहाची फुले खावून गुजरण करीत होता. जंगलात लाकूडफाटा तोडून गायी म्हशी बाळगीत असे. तसेच शेतकरी साळी कोश्टी, लोहार, सुतार अशा अनेक लोकांच्या हाताखाली काम करीत या ग्रामीण अर्थव्यवस्थेमुळे ग्रामातील धन ग्रामातच राहील. हे स्वरूप बदलले व शेतकऱ्यांची दयनीय अवस्था उभी राहीली गावगड्यांचे स्वरूप बदलले.

**२) इंग्रजी व्यापाराची निती :**

इंग्रजांनी भारतात व्यापार सुरू केला हळूहळू आपला जम बसविला आणि भारतातील कच्चा माल खरेदी केला व त्यातून उपयोगी वस्तू जसे पाव, बिस्किट, हलवे, लोणचे आदी अनेक वस्तू यंत्राद्वारे इंग्रजांनी युरोपात मोठ्या प्रमाणात असा माल तयार केला तो भारतात विकायला आणला यामुळे भारतीय कुटीर व लघु उद्योग बंद पडले ही इंग्रजांची मिती त्यात सर्वसामान्य गरीब शेतकरी नाडल्या गेले. यामुळे लोक गाव सोडून पळू लागले गावगड्याचे स्वरूप विस्कटल्या गेले. अनाचार दुराचार व्यसनाधिनता याला ग्रामीण जीवन बळी पडले. हे राजकीय बदलामुळे झाले.

३) ग्रामीण लोकांचे आर्थिक शोशण :

ग्रामीण जनजीवन विस्कळीत करण्यामागे केवळ सरकारच नव्हे तर गावातील ब्राम्हण वर्ग भट भिक्षुकी करणारा वर्ग अज्ञानी जनतेला सर्रास फसवत होता. ब्राम्हणाच्या आशीर्वादाने शेतकरी वर्गाचे उत्थान होऊन त्यांची उन्नती प्रगती होईल असा कुठलाही प्रकारचा विश्वास फुल्यांना उरला नाही उलट त्याची पिळवणूक करून त्याच्या रक्ताने माखलेल्या पैशावर चैन करीत गेला. ब्राम्हण सामान्य जनतेला पाळण्यापासून स्मशानापर्यंत धर्माच्या नावाखाली छळत होता. आणि आर्थिक शोशण करीत होता. आणि गरीब शेतकरी वर्गाचे धार्मिक कर्माचे द्रव्यनाशाचे कर्जवाढीचे ओझे कायमच होते.

४) लग्न विषीतील खर्च:

शेतकरी वर्ग नको त्या तीथीला बळी पडून कर्जाचे डोंगर आपल्या खांद्यावर घेत होता. ग्रामीण भागाता मुलामुलींचे लग्न म्हटले की, ब्राम्हण वर्ग कुंडली पाहणे ग्रहमान सांगणे जप तप सांगणे हस्त गोश्टी सर्रास करीत असे. त्याबद्दल मोठी दक्षिणा तांदूळ, सुपारी, विड्याची पाने सुकामेवा सर्व काढून नेणे हे कार्य करीत असे. लग्न कार्यात वधुवरांच्या मामांच्या हाती तलवारी द्यायच्या त्यावेळी त्यांची नजर धनधान्य अजून काय लुटता येईल याकडे असायची दक्षीणा सर्मपयानी असे म्हणून दरोडेखोरी वृत्तीने संपत्ती जमा करण्यात ब्राम्हण वर्ग माहीर होता यामुळे हुंडा प्रथा वेगळी, ब्राम्हणांना देण्याची संपत्ती वेगळी, अशा दुहेरी कैचीत सामान्य शेतकरी सापडत होता.

५) व्यवहार ज्ञानापासून दूर ठेवणे:

ब्राम्हण वर्ग मुळातच ज्ञानी समजला जातो. मात्र त्यांनी शुद्रांना अंधारातच ठेवले त्यांनी आपल्या संस्कृत विद्यालयात शुद्रांना गरीबांना प्रदेश नाकारला होता. व्यवहार ज्ञानापासून त्यांना दूर ठेवले ज्ञान असून पांगळे केले. गुरूदक्षिणा भरमसाठ द्याव्यात मोबदल्यात मुळाद्वारे मोडी कागदवाचन शिकविले की झाले. खऱ्या ज्ञानापासून त्यांनी ग्रामीण जनतेला मागे ठेवले.

६) शेतकऱ्यांची जमीनी गहाण:

शेतकरी लोकांना लुबाडणारा दुसरा वर्ग म्हणजे मारवाडी सावकार यांनी दारिद्र्याच्या पाहणीवर पाहीले व्याज काढून उर्वरीत कर्ज रक्कम देण्याची परंपरा चालवली शेतजमीनी गहाण ठेवायला सांगायचे कर्ज फिटले की परत देण्याचे आश्वासन द्यायचे पण ते परत करण्याचे कार्य मारवाड्यांनी केले नाही. कमी रकमेत शेतकऱ्याला शेतहीन करण्यात धनकोने आपल्या जीवनाची धन्यता मानली. शेतकऱ्याच्या जीवावर कुळकर्णी, ब्राम्हण कामगार, न्यायाधीश यांनी आपली संपत्तीक स्थिती उत्तम केली. शेतकरी देशोधडीला लागले, अल्प भूधारक झाले.

७) शेतकऱ्यांच्या भांडणात इतरांचे आर्थिक हित:

शेतकऱ्यांचे आपआसात जागेसाठी विहीरीसाठी वाद होत. तेव्हा तूला जिंकून देतो म्हणून ब्राम्हण, कारकून कामगार शेतकऱ्याला नाडवायचा ज्यांच्याकडून आर्थिक बळ जास्त मिळे त्यांचे बाजून कोर्टात अर्धवट सत्य बोलायचे खोटे कागदपत्र तयार करायचे. शिरस्तेदारांना पटवायचे आणि गरीब दुबळ्या शेतकऱ्याला अशा वेळी न्याय मिळणे कठीणच. यात पोळी भाजली जायची ती काम करणाऱ्या कारकून कामगाराची सरकारने कर्जनिवारण कायदे केले परंतु ह्या परिस्थितीमुळे त्याचा काही उपयोग झाला नाही. इंग्रजांनी सर्व खाते ब्राम्हण वर्गाच्या नावे केले जसे महसूल खाते, जंगल खाते, न्याय खाते यामुळे सामान्य शेतकऱ्यांचे शोशण होत होते.

८) अज्ञान हे मुळ कारण:

महात्मा फुल्यांनी सर्व परिस्थितीचा विचार केला तेव्हा अस्पृश्य. शेतकरी यांच्या अज्ञानामुळे येथील गट

सावकार, कारखानदार, मालगुजार फायदा घेत. ज्योतीराव म्हणतात अज्ञान हे याचे मुळ कारण आहे. कश्टकऱ्यांच्या सत्तेने सहभाग असल्याशिवाय त्यांच्या प्रगतीत गती येणार नाही. आर्थिक दरी मिळणार नाही. आणि ते शिक्षणाने होवू शकते म्हणून याकार्याला शिक्षणाची महत्वाची गरज फुल्यांनी सांगितली.

ज्योतीरावांनी शेतकरी सामान्य शुद्रतिशूद्रांचे शोषण हे विविध धार्मिक तणावातून उत्सवातून भर कामगारांच्या अन्यायी वृत्तीतून तसेच इंग्रज राजवट, सावकारशाही आदीतून होते हे त्यांच्या वरील आर्थिक विचारातून स्पश्ट होते. फुले हे अर्थशास्त्राचे खास अभ्यासक नव्हते पणशेतकरी वर्गाच्या दैन्यदारिद्र्याची मुख्य कारण अर्थव्यवस्थेत कशी सामावली आहे ते परखडपणे दाखवितात.

## संदर्भ सूची :-

१) महाराष्ट्रातील समाजसुधारक —पोटे शिवदास
२) महाराश्ट्राचे तेजस्वी ज्ञानयोगी— अत्रे प्र. के.
३) शेतकऱ्याचे आसू — फुले महात्मा ज्योतीबा
४) सार्वजनिक सत्यधर्म— फुले महात्मा ज्योतीबा
५) भारतीय संस्कृती — साने प. सं.
६) भारतीय सृस्कृती व समाजजीवनाचे कट्टर समर्थक — जोशी गणेश वासुदेव

PLEASE VISIT OUR WEBSITE
Www.irasg.com